# घर, कार्यालयातून थेट मेट्रो स्थानकावर!

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

मेट्रो स्थानकाशेजारी काही अंतरावर तुमचे व्यावसायिक किंवा निवासी संकुल असेल तर तुम्हाला संकुलातून थेट मेट्रो स्थानकात प्रवेश करण्याची सोय उपलब्ध होऊ शकते. कुलाबा वांद्रे सीप्झ मेट्रो ३ या भूमिगत मार्गाच्या स्थानकालगतच्या संकुलातील लोकांना संकुलातून थेट भुयारी मार्गाच्या माध्यमातून स्थानकात पोहोचण्याचा पर्याय उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने पावले उचलण्यास सुरुवात केली आहे.

कुलाबा वांद्रे सीप्झ हा मेट्रो मार्ग शहर भाग तसेच उपनगरांतून जातो. मार्गाच्या आसपासचा परिसर अत्यंत गजबजलेला आहे. मार्गात असंख्य व्यावसायिक तसेच निवासी संकुले, हॉस्पिटल, शैक्षणिक संस्था, तसेच करमणुकीची केंद्रे आहेत. त्यामुळे या भागात लोकांचा सदैव राबता असतो.

## मेट्रो रेल कॉर्पोरेशनचा भुयारी मार्गाचा पर्याय



### कनेक्टिव्हीटीची गरज

प्रवाशांना मेट्रो स्थानक ते कार्यालय किंवा निवास या दरम्यान प्रभावी कनेक्टिव्हिटी देणे हा सर्वच मेट्रो प्रकल्पांपुढील महत्त्वाचा मुद्दा आहे. कनेक्टिव्हिटी असेल तर प्रवाशांना वाहतुकीची साधने बदलण्याची गरज नसते. तसेच मेट्रो ते कार्यालय असा थेट प्रवास करता येऊ शकतो. जपानमध्ये तसेच भारतात बेंगळुरू शहरात अशा प्रकारे मेट्रो स्थानक ते कार्यालये भूमिगत मार्गांनी जोडले गेले आहेत.

- मेट्रो तीन मार्गातील व्यावसायिक केंद्रे
- कफ परेड, कुलाबा, वरळी, बीकेसी, एमआयडीसी, सीप्झ.

मुंबई तसेच परिसरातून असंख्य लोक या परिसरात कामानिमित्त येत असतात. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या मेट्रो ३ प्रकल्पासह भविष्यात एमएमआरडीएचेही काही मार्ग कार्यान्वित होणार आहेत.

मेट्रोने प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या कनेक्टिव्हिटीच्या दृष्टीने कॉर्पोरेशनने आखणी सुरू केली आहे. मेट्रोमधून उतरल्यानंतर लगतच असणारी कार्यालये तसेच निवासी संकुलात जाण्यासाठी प्रवाशांना पुन्हा रस्त्यावरून पायपीट करावी लागते. ही गैरसोय टळावी, हा कॉर्पोरेशनचा उद्देश आहे.

त्यातूनच या संकुलात येणाऱ्यांना भुयारी मार्गाच्या माध्यमातून थेट मेट्रो स्थानकापर्यंत नेण्याची सुविधा देण्याचा विचार आहे. त्यामुळे या मंडळींना स्थानकापर्यंत पोहोचण्यासाठी रस्त्यावर येण्याची गरज राहणार नाही. ही सुविधा पुरवण्याआधी या संकुलातील किती लोक मेट्रोने दैनंदिन प्रवास करणारे असतील, याचा आढावा घ्यावा लागणार आहे. बहुसंख्य प्रवासी मेट्रोचे असतील तरच भुयारी मार्ग व्यवहार्य ठरेल. त्यादृष्टीने चाचपणी केली जाणार आहे. या संकुलात राहणारे किंवा कामानिमित्त येणारे, संकुलातील कंपन्यांची कार्यालये यांना त्यांच्या संकुलातील बहुसंख्य प्रवासी मेट्रोने प्रवास करणार असतील तर तसा प्रस्ताव कॉर्पोरेशनला द्यावा लागेल. त्यामुळे नेमक्या कोणत्या भागात संकुल ते मेट्रो स्थानक दरम्यान भुयारी मार्गाची आवश्यकता आहे हे समजेल. एकदा का प्रवासी संख्या निश्चित झाली की पुढील काम सोपे होणार आहे.